लोकमत

लोकमत इन्फोस्टोरी

# ज्येष्ठांना तीन हजार; साडेसहा हजार अर्ज!




**नागपूर :** राज्य शासनाने ६५ वर्षे व त्यावरील ज्येष्ठ नागरिकांना मदतीचा हात म्हणून "मुख्यमंत्री वयोश्री" योजना सुरू केली. या योजनेतून लाभार्थ्यांच्या खात्यावर एकवेळ एकरकमी रुपये तीन हजारांचे अर्थसहाय्य देण्यात येणार आहे. मुख्यमंत्री वयोश्री योजनेअंतर्गत पात्र ज्येष्ठ लाभार्थ्यांना त्यांच्या शारीरिक असमर्थता/दुर्बलतेनूसार चष्मा, श्रवणयंत्र, ट्रायपॉड, स्टीक व्हील चेअर, फोल्डिंग वॉकर, कमोड खुर्ची, नी-ब्रेस, लंबर बेल्ट, सर्वाइकल कॉलर खरेदी करता येतील. राज्य शासनाद्वारे नोंदणी करण्यात आलेल्या योगा उपचार केंद्र, मन:स्वास्थ केंद्र, मन:शक्ती केंद्र, प्रशिक्षण केंद्र येथे त्यांना सहभागी होता येणार आहे. या योजनेसाठी नागपूर जिल्ह्यात आतापर्यंत साडेसहा हजारांवर अर्ज आले आहेत.

## काय आहे मुख्यमंत्री वयोश्री योजना?

राज्य शासनाने ६५ वर्षे वय व त्यावरील ज्येष्ठ नागरिकांना मदतीचा हात म्हणून "मुख्यमंत्री वयोश्री" योजना सुरू केली. या योजनेतून लाभार्थ्यांच्या खात्यावर एकवेळ एकरकमी तीन हजारांचे अर्थसहाय्य देण्यात येणार आहे.

## योजनेची जबाबदारी मनपा आयुक्त- जिल्हाधिकाऱ्यांवर

या योजनेअंतर्गत लाभार्थ्यांची निवड, योजनेची अंमलबजावणी व देखरेख करण्याच्या उद्देशाने ग्रामीण भागाकरीता जिल्हाधिकारी व शहरी भागाकरिता महानगरपालिका आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली समित्या गठीत केल्या आहेत. जास्तीत जास्त लाभार्थ्यांना याचा लाभ घेता यावा याकरीता याबाबत प्रत्येक जिल्ह्यात कार्यशाळेचे तसेच शिबिराचे आयोजन करण्यात येत आहे.

## ज्येष्ठांना मिळतात तीन हजार रुपये



ज्येष्ठ नागरिकांना त्यांच्या दैनंदिन जीवनात सामान्य स्थितीत जगण्यासाठी आणि त्यांना वयोमानपरत्वे येणाऱ्या अपंगत्व, अशक्तपणा यावर उपाययोजना करण्यासाठी आवश्यक सहाय्य साधने/उपकरणे खरेदी करण्याकरीता तसेच मन:स्वास्थ केंद्र, योगोपचार केंद्र इ. द्वारे त्यांचे मानसिक स्वास्थ अबाधित ठेवण्यासाठी प्रबोधन व प्रशिक्षणाकरीता या योजनेअंतर्गत एकवेळ एकरकमी ३ हजार लाभार्थ्यांच्या बचत खात्यात थेट वितरीत करण्यात येते.

## निकष काय?

३१ डिसेंबर २०२३ रोजी वयाची ६५ वर्ष पूर्ण केलेल्या व कौटुंबिक वार्षिक उत्पन्न दोन लाख रुपयांच्या आत असलेल्या ज्येष्ठ नागरिकांना या योजनेचा लाभ घेता येणार आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी आधारकार्ड, मतदान कार्ड, राष्ट्रीयीकृत बँकेचे पासबुक, पासपोर्ट आकाराचे २ छायाचित्रे, स्वयंघोषणापत्र आदी कागदपत्रांची आवश्यकता आहे.

## जिल्ह्यातून पाच हजार अर्ज

या योजनेसाठी नागपूर जिल्ह्यातून आतापर्यंत एकूण ६,५५९ अर्ज प्राप्त झाले आहेत.

योजनेच्या अधिक माहितीसाठी संबंधित जिल्ह्याचे सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण कार्यालये, शासकीय वसतिगृहे व शासकीय निवासी शाळा कार्यालयात संपर्क साधावा. कार्यालयात पात्र ज्येष्ठ नागरिकांनी आवश्यक कागदपत्रांसह अर्ज भरुन सादर करण्याची सोय उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

- डॉ. सिद्धार्थ गायकवाड, प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण विभाग नागपूर